जा क्र मसके/पअपां/ठेका/३२१/2375/२०२२
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली
दिनांक : १२.०८.२०२२

प्रति,

---
---
---

# जाहीर नोटीस

मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली अंतर्गत पांगारी येथील प्रक्षेत्रावर खालिल प्रमाणे कामे करावयाची आहेत.

| गट क | कामाचा तपशिल (कालावधी ०१.०९.२०२२ ते ३१.०१.२०२३) |
|---|---|
| १ ते ३ | **क्षेत्र 35.20 हे.** गट क्र.१ ते ३ मधील आंबा लागवडीतील ग्लिरीसिडीया झाडे, आईन, किंजळ आदी जंगली झाडांची झुडपे, झाडांच्या बुंध्याजवळची आणि झाडाच्या विस्ताराखालील दिंडा, कुडा, लाजरी, करवंद सारखी सर्व काटेरी झुडपे, जमिनी लगत तोडून, तोडलेला कुजण्यायोग्य पाला पाचोळा गोळा करणे, गोळा केलेला कुजण्यायोग्य पालापाचोळा सरळ ओळींमध्ये चेपून बेड तयार करणे. जळाऊ लाकूड असल्यास तोडून, गोळा करून त्याचे बास सारखे चौकोनी गट रचून ठेवणे. |

उपरोक्त प्रमाणे प्रक्षेत्रावरील कामे ठेका पध्दतीने करावयाची आहेत. कामाच्या अटी व शर्ती इत्यादी माहिती तसेच भरून दयावयाचे संमत्तीपत्र आणि दरपत्रक नमूना या कार्यालयात कार्यालयीन कामाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल. कंत्राटी कामाचे दरपत्रकामध्ये प्रती गुंठा मजुरी दराचा स्पष्टपणे उल्लेख करावा. दरपत्रक या कार्यालयाने तयार केलेल्या नमूना पत्रामध्येच भरून द्यावयाचे आहे. आपले दरपत्रक आणि संमंतीपत्र या कार्यालयात दिनांक २९.०८.२०२२ पर्यंत किंवा त्यापुर्वी पोहोचेल असे पाठवावे. विहीत दिनांकानंतर प्राप्त होणा-या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही. लखोटयावर **"पांगारी विभागाअंतर्गत कंत्राटी कामे"** असा उल्लेख करावा, लिफाफा मोहोरबंद करून मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली (पांगारी विभाग) यांचे नावे पाठवावा. पोस्टाव्दारे होणा-या विलंबास हे कार्यालय जबाबदार असणार नाही. दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांचा राहील. दरपत्रकाच्या अटी व शर्ती सोबत जोडण्यात येत असून त्या ठेकेदारास बंधनकारक असतील. सदर अटी व शर्ती मान्य असल्यास दरपत्रक सादरीकरणाचे वेळी मान्यतेबाबत स्वाक्षरी करून दरपत्रकासोबत जोडण्यात याव्यात.

संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली.